दै. लोकमत दि. 27.10.25

# दागिन्यांची हरविलेली बॅग पोलिसांनी शोधली



लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** दिवाळीनिमित्त माहूर येथील श्री रेणुका गडावर दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येत आहेत. त्यामुळे या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यातच जालना जिल्ह्यातील एका भाविकाची बॅग हरविली होती. या बॅगमध्ये रोख रक्कम आणि दागिने असा साडेतीन लाख रुपयांचा ऐवज होता. भाविकाने पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानंतर अवघ्या काही तासांत पोलिसांनी हरविलेली बॅग शोधून भाविकाच्या ताब्यात दिली.

योगेश किशोर धारोरकर (रा. मंठा, जि. जालना) २५ ऑक्टोबर रोजी माहूर येथे दर्शनासाठी आले होते. त्यांनी जवळील बॅगेत दागिने आणि रोख रक्कम ठेवली होती; परंतु ही बॅग ते हरविले होते. त्यानंतर त्यांनी पोलिस ठाणे गाठून हकीकत सांगितली.

पोनि. गणेश कराड यांच्या सूचनेवरून धारोरकर आणि त्यांच्या बहिणीला घेऊन पोलिसांनी गेस्ट हाऊस परिसर, रोशन सायकल स्टोअर यासह ते ज्या-ज्या ठिकाणी गेले होते. त्या ठिकाणी तपासणी केली. त्यात एका दुकानात आढळून आली. पोलिसांनी धारोरकर यांना बॅग दाखविली. तसेच त्यातील दागिनेही तपासून घेतले. त्यानंतर ही बॅग भाविकाला परत करण्यात आली. हरविलेली दागिन्यांची बॅग परत मिळाल्याने भाविकाचा जीव भांड्यात पडला होता.